


॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी



संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

▪ अहिल्यानगर ▪ शनिवार, दि. १० मे २०२५ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक २९ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145


# पाकचा रडीचा डाव

## नागरी विमानांचा ढाल म्हणून वापर, भारताने खोलली पोल



**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

पाकिस्तानची गुरुवारपासून आगळीक सुरू असून भारतातील सीमेलगतच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये गोळीबार सुरू केला आहे. त्याला भारतीय सैन्याने जशास तसे उत्तर दिले. गुरुवारी रात्री पाकिस्तानने ४०० ड्रोनद्वारे भारताच्या जवळपास ३६ ठिकाणांवर हल्ल्याचा प्रयत्न केला. तसेच क्षेपणास्त्रांचाही मारा केला. परंतु भारताने पाकिस्तानचे हे हल्ले निष्प्रभही केले. पण भारतावर हल्ला करणा–या पाकिस्तानने सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ केल्याचे पुरावे समोर आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे रडीचा डाव खेळत नागरी हवाई क्षेत्र बंद न करता नागरी उड्डाणांचा थेट ढाल म्हणून वापर करणे सुरू आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय उड्डाणांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे.

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांच्या उपस्थितीत सायंकाळी आयोजित पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी आणि व्योमिका सिंग यांनी गुरुवारच्या युद्धभूमीवरील घडामोडींची माहिती देताना पाकिस्तानची पोल खोलली. भारताने प्रतिहल्ला करू नये, म्हणून पाकिस्तानने नागरी विमानांसाठी हवाई हद्द बंद केली नाही. पाकिस्तानचा ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न अयशस्वी ठरलेला असतानाही आपले नागरी हवाई क्षेत्र बंद केलेले नाही. उलट नागरी विमानांचा चक्क ढाल म्हणून वापर करणे सुरू केले. त्यामुळे पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना नागरी विमानांना आणि नागरिकांना नुकसान होऊ नये, म्हणून भारताने सावध पावले उचलत पाकला प्रत्युत्तर दिले.

पाकिस्तानने गुरुवारी रात्री भारताची वायू हद्द ओलांडली, त्यावेळी भारताने ४ ड्रोनच्या माध्यमातून प्रतिहल्ला केला. एवढ्या मोठ्या प्रमाणात ड्रोन हल्ले करून पाकिस्तानला भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेची ताकद जाणून घ्यायची होती. पाकिस्तानने हल्ल्यासाठी वापरलेले ड्रोन तुर्कीचे होते. यातील बहुतांश ड्रोन भारताने नष्ट केल्याची माहिती कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली.

### तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांशी मोदींची चर्चा

▪ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिन्ही सैन्याच्या माजी प्रमुखांशी चर्चा केली. राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भात मोदींची सैन्याच्या माजी प्रमुखांशी चर्चा झाली. यावेळी पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी बैठकीत रणनीती ठरली.

### भारतातील २८ विमानतळे बंद

▪ भारताने जम्मू, श्रीनगर, लेह, अमृतसर, चंदिगढ, जोधपूरसह २८ विमानतळ बंद केले आहेत. २८ विमानतळ १५ मेच्या सकाळी ५ वाजून २९ मिनिटांपर्यंत बंद असणार आहेत. त्यामुळे एअर इंडिया, इंडिगो, स्पाईसजेटनं या शहरांमधून होणारी उड्डाणं रद्द केली. देशातील संवेदनशील विमानतळांची आणि त्यांच्या परिसरांची सुरक्षा वाढवण्यात आली.

# राज्यातील अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द

## युद्धजन्य परिस्थितीत वॉररूम, मॉकड्रील । मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्देश

**● मुंबई । वीरभूमी–**

भारत आणि पाकिस्तानच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील महत्त्वाच्या पदांवरील विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. भारत पाक युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतलाय. भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.या बैठकीत काही महत्त्वाचे निर्देश देण्यात आले आहेत.

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते



### नागरीकांना दिल्या सुचना

▪ प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हास्तरावर वॉर रूम स्थापित करा.

▪ ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.

▪ प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा.

▪ प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा.

▪ एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.

▪ पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिंग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.

▪ सैन्याच्या तयारी संबधित गतिविधीचे चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.

▪ नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.

# भारताने जैसलमेरमध्ये ९, अमृतसरमध्ये १५ ड्रोन पाडले

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

सीमेपारकडून पाकिस्तानने पुन्हा कुरापती करण्यात सुरूवात केली आहे. पाकिस्तानकडून सीमेलगतच्या भागांमध्ये जोरदार गोळीबार सुरू आहे. शुक्रवारी संध्याकाळी जम्मू–काश्मीरच्या अनेक भागांमध्ये सीमेपलीकडून गोळीबार करण्यात आला.

यानंतर पाकिस्तानने पूंछ आणि कुपवाडा सेक्टरमध्येही सीमेपलीकडून गोळीबार केला.

अमृतसरच्या ५ विविध भागांमध्ये कमीत कमी १५ ड्रोन दिसले. सूत्रांच्या माहितीनुसार, यातील अधिक ड्रोन निष्क्रिय करण्यात आले आहेत. अमृतसरमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांच्या येण्याजाण्यावरही बंदी घालण्यात आली आहे.

राजस्थानच्या जैसलमेर जिल्ह्यात एकूण ९ पाकिस्तानी ड्रोन पाडण्यात आले. बाडमेरमध्ये कलेक्टरने एक ड्रोन मारल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

पंजाबच्या फिरोजपूरमध्ये पाकिस्तानकडून पाठवण्यात आलेले ड्रोन भारताच्या एअर डिफेन्स सिस्टीमने निष्क्रिय केले आहेत. निष्क्रिय पाकिस्तानी ड्रोनमधून स्फोटक साहित्य एका घरावर पडले यामुळे आगीचे लोळ उठले. घरात राहणाऱ्यांनी त्यावर पाणी टाकून लागलेली आग विझवली.

# शिर्डीतील साईबाबा मंदिर सुरक्षेत वाढ

**● शिर्डी । वीरभूमी–**

शिर्डी हे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र असल्याने तेथे भाविकांची वर्षभर मोठी गर्दी असते. भारत– पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर साई मंदिराची सुरक्षा यंत्रणा वाढविण्यात आली असून मंदिर परिसरात प्रवेश करताना प्रवेशद्वारावर हार–फुले व पाकिटांची 'स्कॉनिंग मशिन'द्वारे तपासणी करण्यात येत असून गरज भासल्यास अतिरिक्त बंदोबस्त मागवणार असल्याची माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.



चार ते पाच दिवसांपूर्वी शिर्डीच्या साई संस्थानच्या अधिकृत मेल आयडीवर मंदिर पाईप बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली होती. या धमकीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस व साई संस्थानची सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली होती. शिर्डीचे साई मंदिर हे दहशतवाद्यांच्या हिटलीस्टवर असल्याचे काही वर्षांपूर्वी केंद्रीय गुप्तचर विभागाने अहवाल दिला होता तसेच भारत– पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आता मंदिराच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर कधी नव्हे ती भक्तांची तपासणी सुरू झाली.

साई मंदिर सुरक्षेसाठी अतिरिक्त पोलीस की जे नेहमी आपल्याजवळील हत्यारे बाजूला ठेवून खुर्चीवर बसून मोबाइलमध्ये व्यस्त असतात, तेही सतर्क झाल्याचे पाहावयास मिळाले. स्कॅनिंग मशीनद्वारे पर्स, प्रसादाच्या बॅग, हार, फुले यांची तपासणी होत आहे. मंदिरात मोबाइल, कॅमेरे नेण्यास सक्त बंदी करण्यात आली आहे.

> साईमंदिराचे बॉम्बशोध पथक (बीडीएस) आणि डॉग स्कॉड पथक मंदिर व परिसराची कसून तपासणी करीत आहे. साईबाबा मंदिराचे ९७३ सुरक्षा कर्मचारी आणि पोलीस पथक बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. यासंदर्भात संस्थानच्या सर्व यंत्रणांची बैठक घेऊन सुचना करण्यात आल्या आहेत. परिसरात काही संशयास्पद वस्तू आढळल्यास भक्तांनी संस्थानच्या सुरक्षा यंत्रणेशी संपर्क साधावा. मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सुरक्षा यंत्रणेची आढावा बैठक झाली. त्यासंबंधी मंदिर परिसरातील सुरक्षेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे.
>
> **– गोरक्ष गाडीलकर,** मुख्य कार्यकारी अधिकारी साईबाबा संस्थान, शिर्डी

# संरक्षण मंत्रालयाकडून 'लाइव्ह रिपोर्टिंग'वर बंदी

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

भारत–पाकिस्तान सीमेवरील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने डिजीटल आणि इलेक्ट्रॉनिक वृत्तवाहिन्यांना लाइव्ह रिपोर्टिंग टाळण्याचा सल्ला दिला आहे. अशा संवेदनशील माहितीचे प्रसारणामुळे 'ऑपरेशनल कारवाईसाठी' धोका निर्माण होऊ शकतो. यापूर्वी कारगिल युद्ध, कंदहार विमान अपहरण आणि २६/११ हल्ल्यावेळी झालेल्या लाइव्ह रिपोर्टिंग(थेट वार्तांकन)मुळे निर्माण झालेले अडथळे लक्षात घेऊन हे आदेश देण्यात आले आहेत.

२६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यावेळी माध्यमांनी सुरुवातीचे दोन दिवसांचे रिपोर्टिंग लाइव्ह केले होते. हेच रिपोर्टिंग बघून दहशतवाद्यांना त्यांचे हॅन्डलर्स फोनवरून पुढील सूचना देत असल्याचे समोर आले होते. सैन्याच्या पुढील कारवाईचा अंदाज यामुळे दहशतवाद्यांना मिळत होता. हाच धोका यावेळी टाळण्यासाठी माध्यमांना लाइव्ह रिपोर्टिंग टाळण्याचा सल्ला केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने दिला आहे. संवेदनशीलता बाळगण्याचे आणि जबाबदारीने वार्तांकन करण्याचेही आवाहन संरक्षण विभागाने दिले आहे.

जम्मू–कश्मीर मधील पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादांचे ९ तळ उद्ध्वस्त केले आहेत. त्यानंतर भारत–पाकमधील तणाव वाढला आहे. गुरुवारी दुपारी पाकिस्तानकडून भारताच्या सीमाभागातील १५ गावांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. भारताने हा प्रयत्न हाणून पाडला. त्यानंतर भारताने पाकिस्तानच्या हल्ल्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. भारताने पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टिम उद्ध्वस्त केली.

त्यानंतरही भारतीय लष्करी तळावर हवाई हल्ला करणा–याचा प्रयत्न पाकिस्तानने केला. यालाही भारताने करारा जवाब दिला आहे. भारत–पाक तणावानंतर अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी वेंस आणि चीनने मोठे विधान केले आहे. 'भारत–पाकच्या सुरु असलेल्या युद्धात अमेरिका सहभागी होणार नाही, ते आमचे काम नाही, अमेरिका भारत आणि पाकिस्तानाला नियंत्रित करु शकत नाही. पण दोन्ही देशांना अणुशक्तीचा वापर न करण्याचा सल्ला दिला आहे.

# पुंछमध्ये राज्यातील २ जवानांना विरमरण

**● मुंबई । वीरभूमी–**

पाकिस्तानचे हल्ले परतवून लावत असताना भारतीय सैन्य दलातील २ जवान शहीद झाले आहेत. यात मुंबईतील रहिवाशी असलेले आणि मूळचे आंध्र प्रदेशचे मुरली नाईक, तर दुसरे जवान दिनेश शर्मा यांना पूँछ सेक्टरमध्ये पाकिस्तानशी लढताना वीरमरण प्राप्त झाले. गोळीबारात जखमी झाल्यानंतर शर्मा यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे दरम्यान दिनेश शर्मा यांच्या रहिवासासंदर्भातील माहिती अद्याप मिळालेली नाही.



मुंबई येथील मुरली नाईक हे दि. ९ मे रोजी पहाटे पाकिस्तानसोबत झालेल्या युद्धात शहीद झाले आहेत. मुंबई येथील घाटकोपर येथे त्यांच्या शहीद झाल्याचे बॅनर लावले आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री यांनी ट्विट करत शहीद जवान मुरली नाईक यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. नाईक हे सत्यसाई जिल्ह्यातील गोरंटला तालुक्यातील रहिवाशी होते.

देशासाठी बलिदान देणा–या मुरली नाईक यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो, नाईक कुटुंबीयांप्रती सहवेदना आहेत असे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केल्या आहेत.

वीरभूमी

## SPOT NEWS

### मोनिका झरेकरची सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारीपदी निवड

● **नगर । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग २०२३ मार्फत सहाय्यक



उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (वर्ग एक) पदासाठी घेतलेल्या परीक्षेतून खातगाव टाकळी (ता. नगर) येथील रहिवाशी मोनिका बाळासाहेब झरेकरची निवड झाली आहे. मंत्रालय कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, वजन–मापे निरीक्षक अधिकारी आणि कर व प्रशासकीय अधिकारी नगरपरिषद अशा चार पदांसाठी तिची यापूर्वी निवड झाली होती. मोनिका झरेकरचे प्राथमिक शिक्षण ऑक्सिलियम कॉन्व्हेंट लोणावळा (जि.पुणे) येथे झाले. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातून मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयात पदवी घेतली. त्यानंतर काही काळ एका खासगी कंपनीत काम केले. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत प्रशासकीय सेवेत येण्याचा निर्धार करून परीक्षेच्या अभ्यासाला सुरूवात केली. जिद्ध व चिकाटी असल्यामुळे आणि कुटुंबाची साथीमुळे उच्च पद प्राप्त केले. तळेगाव दाभाडे (जि. पुणे) येथे कर व प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे. या कालावधीत सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (वर्ग एक) पदासाठी दिलेल्या परीक्षेद्वारे निवड झाली आहे. मोनिकाचे वडील बाळासाहेब झरेकर हे नौदलातून नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त बबनराव झरेकर आणि नौदलातील सेवानिवृत्त अधिकारी रघुनाथ झरेकर यांची ती पुतणी आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश शिंदे यांची ती भाची आहे.

### रेल्वे स्टेशन रोडवर प्राध्यापकावर पहाटे चाकूने हल्ला

● **नगर । वीरभूमी–**

प्राध्यापकावर पहाटेच्या वेळी तीन अनोळखी व्यक्तींनी चाकूने हल्ला करून त्यांना जखमी केल्याची घटना मंगळवारी (६ मे) पहाटे ३.४५ वाजण्याच्या सुमारास रेल्वे स्टेशन रस्त्यावरील लोखंडी पुलाजवळ घडली. निखील विकास बोरकर (वय ३४ रा. वैशालीनगर, वाघापूर, यवतमाळ, हल्ली रा. आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, अहिल्यानगर) असे जखमी प्राध्यापकाचे नाव आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी दिलेल्या जबाबावरून बुधवारी (७ मे) रात्री कोतवाली पोलीस ठाण्यात अनोळखी तीन इसमांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोरकर हे फुलसिंगनाईक महाविद्यालय, पुसद (ता. पुसद, जि. यवतमाळ) येथे प्राध्यापक म्हणून नोकरीला आहे. त्यांच्या पत्नी राज्य उत्पादन शुल्कच्या अहिल्यानगर कार्यालयात दुय्यम निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. सध्या उन्हाळी सुट्ट्यांमुळे प्रा. बोरकर आपल्या पत्नी व मुलीसह अहिल्यानगर येथे वास्तव्यास आहेत. मंगळवारी पहाटेच्या सुमारास त्यांना श्वास घेण्यात त्रास जाणवत असल्याने ते मोकळ्या हवेसाठी फिरायला बाहेर गेले होते. ते हॉटेल उदयनराजे परिसरातून परत येत असताना रेल्वे स्टेशन रस्त्यावरील लोखंडी पुलाजवळ एक काळ्या रंगाची दुचाकी अचानक त्यांच्या समोर आडवी लावून तीन अनोळखी युवकांनी त्यांना थांबवले. तिघांच्या चेहऱ्यावर रूमाल बांधलेले होते. त्यांनी प्रा. बोरकर यांच्याकडे पैशांची मागणी केली. पैसे न मिळाल्याने त्यांनी शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरूवात केली.

# शेवगाव-पाथर्डीतील रस्त्यांच्या कामांसाठी निधी द्या

## आ. मोनिकाताई राजळे यांची केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे १७५ कोटी निधीची मागणी

● **पाथर्डी । वीरभूमी –**

केंद्रीय रस्ते निधी अंतर्गत शेवगाव–पाथर्डी तालुक्यातील रस्त्यांच्या कामासाठी सुमारे १७५ कोटींच्या निधींचीमागणी करत तालुक्यातून जाणाऱ्या पैठण–पंढरपूर पालखी मार्ग व खरवंडी–नवगण राजूरी या राष्ट्रीय महामार्गांची कामे तातडीने व्हावीत, तसेच मतदारसंघातून जाणाऱ्या प्रस्तावीत छत्रपती संभाजीनगर ते पुणे या रस्त्याच्या विकास आराखड्याला मंजूरी देवून या रस्त्याचे काम होणेसाठी कार्यवाही करावी. अशा मागण्या आ. मोनिका राजळे यांनी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.



केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी हे नांदूर शिंगोटे ते कोल्हार राष्ट्रीय महामार्गाचे भूमिपूजन व खा. बाळासाहेब विखे यांच्या 'देह वेचावा कारणी' या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशनासाठी लोणी येथे आले असता आ. मोनिका राजळे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील महत्वाच्या व मोठ्या रस्त्यांच्या कामांसाठी केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत सुमारे १७५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली. तसेच बऱ्याच वर्षापासून प्रलंबीत असलेले राष्ट्रीय महामार्ग पैठण–पंढरपूर पालखी मार्ग व खरवंडी – नवगण – राजूरी या रस्त्यांच्या कामांच्या अडचणी बाबत माहिती देत हे महामार्ग तातडीने व्हावेत अशी मागणी केली.

पैठण–पंढरपूर पालखी मार्गातील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादनासाठीचे निवाडे व अवॉर्ड झाले आहेत त्या शेतकऱ्यांना तातडीने मोबदला दिल्यास महामार्गाचे काम सुरळीत व तातडीने होईल. त्यासाठी तात्काळ निधी मिळावा, अशी मागणी केली. तसेच मतदारसंघातून प्रस्तावित असलेल्या छत्रपती संभाजीनगर ते पुणे या नवीन राष्ट्रीय महामार्गाचे सर्वेक्षण होवून विकास आराखडा करण्याचे काम सुरु आहे. हा नवीन महामार्ग लवकरात लवकर मंजूर होवून रस्त्याचे काम करण्याबाबतची मागणी यावेळी मंत्री नितीन गडकरी यांचेकडे आ. राजळे यांनी केली.

यावेळी मंत्री नितीन गडकरी यांनी रस्ते मार्ग निधी देण्याचे आश्वासन देत रखडलेल्या पैठण–पंढरपूर पालखी मार्गाचे काम पुर्ण होण्यासाठी शेतकऱ्यांचे मोबदले अदा करणे व इतर अडचणी सोडवण्याचे आश्वासनही दिल्याचे आ. राजळे यांनी सांगितले.

## शर्डी, शनिशिंगणापूरमध्ये पायाभूत सुविधांसाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश

### सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

● **नगर । वीरभूमी–**

नाशिक–त्र्यंबकेश्वर येथे होवू घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी आणि शनिशिंगणापूर या प्रमुख धार्मिक स्थळांवर पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी तातडीने प्रस्ताव सादर करावेत, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा कार्यकारी समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. विरेंद्र बडदे प्रत्यक्ष उपस्थित होते, तर इतर संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीव्दारे सहभागी झाले. डॉ. आशिया म्हणाले की, उत्तर प्रदेशात कुंभमेळ्याच्या निमित्ताने धार्मिक पर्यटनात मोठी वाढ झाली आहे. त्याच धर्तीवर नाशिकसह जिल्ह्यातील शिर्डी व शनिशिंगणापूर येथे पर्यटन वाढीस चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांची गरज आहे. रेल्वे, रस्ते, विमानतळ इत्यादी वाहतूक सुविधांच्या उन्नतीसाठी प्रस्ताव सादर करावेत. शिर्डीमध्ये पर्यायी रस्ते, बाह्यवळण मार्ग, बायपास रस्ता आणि परिक्रमा मार्गाच्या विकासासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच, वाहतूक सुरळीत राहण्यासाठी योजनाबध्द प्रयत्नांची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

शनिशिंगणापूरकडे जाणाऱ्या रस्त्याचे रूंदीकरण, पार्किंग व्यवस्था, पाणी, विद्युत, वैद्यकीय सेवा, हेलिपॅड, गावांतर्गत रस्ते व स्ट्रीटलाईट उभारणीसाठी आवश्यक निधीच्या प्रस्तावावर भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक साहित्याचीही पूर्तता करण्यास सांगितले असून, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व पातळ्यांवर तयारी करण्याचा जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी पुनरूच्चार केला.

## अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे वेळापत्रक प्रशासनाकडून जाहीर

● **नगर । वीरभूमी–**

मागील वर्षी लोकसभा निवडणुकीमुळे रखडलेल्या जिल्हा परिषद वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना अखेर मुहूर्त लागला आहे. १३ ते १५ मे दरम्यान या बदल्या होणार असून तसे वेळापत्रक जिल्हा परिषद प्रशासनाने जाहीर केले आहे. दरम्यान, कर्मचाऱ्यांच्या बदल्यासाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून यंदाही अधिकारी राजमध्ये कर्मचाऱ्यांच्या बदल्या पार पडणार आहेत.

दरवर्षी मे महिन्यात जिल्हा परिषद कर्मचार्यांच्या बदल्या होत असतात. या बदल्यांची प्रक्रिया करण्यापूर्वी प्रत्येक विभागाच्या बदल्यांसाठी पात्र असणार्या कर्मचार्यांची सेवाज्येष्ठता यादी तयार करून, त्यावर हरकती घेतल्यानंतर पात्र कर्मचार्यांची अंतिम यादी तयार करून ती जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते. यानंतर ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार कर्मचाऱ्यांच्या विनंती आणि प्रशासकीय बदल्या केल्या जातात. गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीमुळे बदल्या होऊ शकल्या नव्हत्या. निवडणुकीनंतर बदल्या होतील, असे वाटत होते. मात्र शासनाकडून काहीही आदेश आले नाहीत. त्यामुळे राज्यभर या बदल्या रखडल्या.

मात्र, यंदा बदल्या करण्यात येणार असून त्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागाने विभागनिहाय वेळापत्रक जाहीर केले आहे. मुख्यालयातील व तालुक्यातील रिक्त पदे भरताना पदांचा समतोल राखण्यात यावा. तसेच आदिवासी दुर्गम भागातील पदे प्राधान्याने भरावीत. त्यानंतर नंतर विनंती बदली व अखेर प्रशासकीय बदलीने तालुकानिहाय पदांचा समतोल राखण्यात यावा, अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांनी दिल्या आहेत. तालुकास्तरावरील बदल्या १९ ते २३ मे या कालावधीत करण्यात येतील, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

### बदल्यांचे वेळापत्रक

■ १३ मे रोजी सकाळी १० ते ११– कृषी विभाग. त्यानंतर ११ ते दुपारी १२.३०– महिला व बालकल्याण. १२.३० ते १.३० – लघु पाटबंधारे विभाग, पाणीपुरवठा विभाग, २.३० ते ३.३० – बांधकाम विभाग आणि ३.३० ते ५.३०– शिक्षण विभाग. १४ मे रोजी सकाळी १० ते ११.३०– अर्थ विभाग. ११.३० ते १.३० – सामान्य प्रशासन विभाग आणि दुपारी २ ते ६ – ग्रामपंचायत विभागातील बदल्या होणार आहेत. १५ मे रोजी सकाळी १० ते ११.३०– पशुसंवर्धन विभाग आणि त्यानंतर ११.३० ते ६ – आरोग्य विभागातील बदल्या होणार आहेत.

# छोट्या शाळांचे अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द व्हावा

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची मागणी; माध्यमिकचे शिक्षणाधिकारी यांना निवेदन

● **नगर । वीरभूमी–**

छोट्या शाळांचे अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या व शिक्षकांना अतिरिक्त ठरविणाऱ्या २८ ऑगस्ट २०१५ चा संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करून पूर्वीप्रमाणे संच मान्यता करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांना निवेदन दिले.

याप्रसंगी जिल्हा कार्यवाह शिवाजी घाडगे, कोषाध्यक्ष प्रसाद सामलेटी, एस. सी. धीवर, एस. डी. उदार, आर. बी. पवार, जे. एस. कोळकर, एस. सी. छजलाने, अभिजीत गवारे, विठ्ठल ढगे, एस. एस. शिरसाठ, दिपक आरडे आदींसह शिक्षक वर्ग उपस्थित होते.

शासन निर्णय २८ ऑगस्ट २०१५ मध्ये दुरुस्ती करून शासन निर्णय ८ जानेवारी २०१६ नुसार इयत्ता नववी, दहावी या वर्गासाठी शिक्षकांची किमान तीन पदे मंजूर होती. त्यामुळे ग्रामीण भागातील छोट्या शाळांमध्ये किमान तीन शिक्षक उपलब्ध होत होते, परंतु शासन निर्णय १५ मार्च २०२४ मधील मुद्दा क्रमांक तीन मधील निकषानुसार इयत्ता नववी मध्ये वीस विद्यार्थी तसेच इयत्ता दहावी मध्ये वीस विद्यार्थी असणे आवश्यक आहे. तर शिक्षक पद मंजूर होणार आहे. अन्यथा इयत्ता नववी, दहावी गटासाठी कोणतेही शिक्षक पद मंजूर होणार नसल्याचा गंभीर नियम असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बहुतांश ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता नववी, दहावी मध्ये विद्यार्थी संख्या ४० पेक्षा कमी आहे. अशा सर्व शाळांमध्ये एकही पद मंजूर न झाल्याने संस्थाचालकांवर शाळा बंद करण्याची वेळ आलेली आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर माध्यमिक शिक्षणाचा बिकट प्रश्न निर्माण होणार आहे. ग्रामीण भागात इतर वर्गात ४०, ४२ विद्यार्थी आहे. परंतु इयत्ता नववी मध्ये १८ विद्यार्थी व इयत्ता दहावी मध्ये २३ विद्यार्थी म्हणजे एकूण ४० पेक्षा पट कमी असूनही शाळेला जीटी (९–१०) गटासाठी एकही शिक्षक मंजूर नाही म्हणजे अशी शाळा आपोआप बंद होणार आहे.

किमान विज्ञान–गणित, समाजशास्त्र, भाषा असे किमान तीन शिक्षक शाळेवर असल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. गावातील शाळेमध्ये २० ते ३० विद्यार्थी आहेत जर ती शाळा नव्या निकषानुसार बंद होत असेल, तर त्या विद्यार्थ्यांचे शिक्षणाची सोय कशी करणार? ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बिकट असून, त्याचा फटका पालकांना बसणार आहे. शिवाय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वेळ वाया जाईल. विद्यार्थ्यांना शारीरिक त्रास होणार तो वेगळाच. या छोट्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी कला, क्रीडा यासाठी शिक्षक नकोत का हा प्रश्न शिक्षक परिषदेने उपस्थित केला आहे.

गावातील छोट्या शाळा बंद झाल्याने हजारो शिक्षक अतिरिक्त ठरणार आहे. त्या अतिरिक्त शिक्षकांचा समायोजनाचा प्रश्न बिकट होणार आहे. याचा परिणाम



पवित्र प्रणालीतील शिक्षक भरतीवर होणार आहे. जवळपास शिक्षक भरती रद्द करावी लागणार, अशी चिन्हे आहेत. शासन निर्णयातील जाचक व ग्रामीण भागात अभ्यास न केल्याने वरिष्ठ कार्यालयातील उच्च अधिकारी यांनी नियोजन शून्य अभ्यासातून घेतलेल्या निर्णयाने शिक्षण क्षेत्राला त्रास होणार असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

शासनाने या निर्णयाचा सखोल ग्रामीण व शहरी भागाचा स्वतंत्र विचार करून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने व भविष्य काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कायद्यामध्ये लवचिकता आणून सुधारित निकषांचा विचार करण्याची मागणी शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. राज्यघटनेने सर्वांना शिक्षणाचा समान अधिकार दिला असून, याबाबत शासनाचे दायित्व नमूद केले असून, त्यांनाही जाचक शासन निर्णयाद्वारे ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था संपणार नाही, या दृष्टीने काळजी घेण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## शहर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत एकलव्य अकॅडमीच्या खेळाडूंचे यश

● **नगर । वीरभूमी–**
तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन अहिल्यानगर व एकलव्य तायक्वांदो कॅडमी अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने कॅडेट व ज्युनिअर मुले व मुलींच्या शहर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा गुरुवारी (दि. ७ मे) रोजी प्रियदर्शनी पब्लिक स्कूल भिंगार या ठिकाणी घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत १८ सुवर्ण, १० रौप्य व ४ कांस्यपदकांची कमाई केली. सुवर्णपदक विजेते खेळाडूंची नाशिक येथे ११ ते १३ मे रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंना ग्रँडमास्टर अल्ताफ खान, मुख्य प्रशिक्षक गणेश वंजारे, योगेश बिचीतकर, सचिन मरकड, मंगेश आहेर, सचिन कोतकर यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व खेळाडूंचे एकलव्य तायक्वांदो अकॅडमीचे अध्यक्ष दिलीप सातपुते, स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा.माणिकराव विधाते, उपाध्यक्ष संतोष लांडे, राज्य उपाध्यक्ष व शहर सचिव घन:श्याम सानप यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. बक्षीस वितरण प्रसंगी धर्मनाथ घोरपडे, नारायण कराळे, राष्ट्रीय पंच शर्मिला शेख उपस्थित होते. यश प्राप्त करणाऱ्या खेळाडूंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## ऑपरेशन सिंदूरचे सकल माळी समाजातर्फे स्वागत

● **नगर । वीरभूमी–**
धर्माच्या नावाखाली निष्पाप हिंदूंचे पाकिस्तानी आतंकवाद्यांनी बळी घेतले आहेत. ही घटना निंदनीय आहे. पाकिस्तानला जशास तसे उत्तर देऊन भारतीय सैनिकांनी पळता भुई थोडी केली आहे. भारताने ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून पाकिस्तानच्या दहशतवादी अतिरेक्यांचे तळ उध्वस्त करून पाकिस्तानचे कंबरडे मोडले आहे. भारतीय सैनिकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.असे प्रतिपादन कॅप्टन सुधीर पुंड यांनी केले आहे. भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून पाकिस्तानच्या दहशतवादी अतिरेक्यांचे तळ उध्वस्त केले. या मोहिमेचे टिळक रोड येथील द टी हाऊस समोर सकल माळी समाजाच्या वतीने फटाके वाजवून जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,सचिव राजेंद्र पडोळे, डॉ.रणजीत सत्रे, कॅप्टन सुधीर पुंड, विनोद पुंड, राजाराम चिपाडे,चंद्रकांत पुंड, पोपट शिंदे, दत्ता गायकवाड, दीपक खेडकर, ब्रिजिश ताठे, संजय कानडे, गणेश कोल्हे, सुरेश कावळे, भाऊसाहेब कोल्हे, बाळासाहेब गायकवाड, नितीन डागवाले, रोहित पठारे आदी उपस्थित होते. यावेळी भारत माता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद,जय श्रीराम, दूध मांगेंगे तो खीर देंगे, कश्मीर मांगेगे तो चीर देंगे अशा घोषणा देत भारतीय सैनिकांचे आत्मबल वाढवले.

# विकासासाठी तारकेश्वर गडाच्या पाठीशी

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे । वै. नारायणबाबा महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा

● **पाथर्डी । वीरभूमी–**
तारकेश्वर गडाचे संस्थापक वै. नारायणबाबा महाराज यांचा समाज प्रबोधनाचा व हिंदुत्वाच्या विचारांचा वारसा 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' असलेले तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री चांगल्या पद्धतीने चालवत असून तारकेश्वर गडाचा विकास व्हावा, यासाठी आपण ठामपणे गडाच्या पाठीशी उभे राहू अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

महिंदा येथील श्रीक्षेत्र तारकेश्वर गडावर आयोजित केलेल्या वै. नारायणबाबा महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणुन ते बोलत होते. यावेळी गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, पद्मश्री पोपटराव पवार, व्याख्याते गणेश शिंदे, अक्षय भोसले, शिवसेनेचे तालुका प्रमुख विष्णुपंत ढाकणे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सध्या भारत पाक युद्ध चालु आहे. पाकड्यांचे कंबर



मोडण्याचे व अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह व राजनाथसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली आपले सैनिक करत असून कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानचे नामोनिशान आता मिटल्या शिवाय राहणार नाही. तारकेश्वर गड हा सर्वांना तारणारा गड असून जवळच मोहटा देवीचे मंदिर असल्याने हा संपूर्ण डोंगर म्हणजे भक्ती शक्तीचा संगम आहे. गडाची महती देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचवण्याचे काम सर्वांनी करायला हवे. नारायणबाबांनी गो मातेची मोठी सेवा करण्याचे काम केले तर गोरक्षकांना संरक्षण देण्याचे काम मी मुख्यमंत्री असताना केले आहे. ज्यांच्या आठवणींनी पुण्यप्राप्ती होते त्यांचीच पुण्यतिथी साजरी केली जाते. नुसते नारायण नारायण म्हंटले तरीही पुण्यप्राप्त होते. राजकीय अधिष्ठनापेक्षा धार्मिक अधिष्ठान महत्वाचे असते.

या ठिकाणी येऊन मला आध्यत्मिक समाधान मिळाले असून हा गड म्हणजे ब्रम्ह व शिवाचे रूप असल्याचेही ते म्हणाले.

आदिनाथ महाराज शास्त्री म्हणाले, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठीशी गड ठामपणे उभा राहील. बाळासाहेब ठाकरे यांचा दुसरा अवतार म्हणजे शिंदे आहेत. मोदी जसे देशात काम करतात तसेच काम शिंदे राज्यात करत असून दोघांमध्ये केवळ पक्षभेद आहे. लाडकी बहीण योजनेमुळे ते घराघरात पोहचले असल्याचेही शास्त्री म्हणाले. सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले.

## मातंग समाजाचे २० मे रोजी आझाद मैदानावर आक्रोश आंदोलन




● **अकोले । वीरभूमी–**
मुंबई येथील आझाद मैदान येथे दि. २० मे रोजी होणाऱ्या मांतग समाजाचे जन आक्रोश महा आंदोलनात लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन दलित मित्र प्रकाश साळवे यांनी केले.

सुप्रीम कोर्टाने अनुसूचित जाती पैकी मातंग समाज हा मागास असल्याचा निर्वाळा दिला असून राज्य सरकारने त्या अनुषंगाने आरक्षण लागू करण्यासाठी सूचना केल्या. त्यानंतर राज्य सरकारने निवृत्त न्यायाधीशांची समिती गठित करून अहवाल मागितला, त्या अहवालात मातंग समाज नोकऱ्या आणि शिक्षणात राजकीय सामाजिक आर्थिक दृष्ट्या मागास दिसून आला त्या साठी अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करून जून २०२५ पासून लागू करावे या मागणीसाठी २० मे रोजी सकाळी १० वाजता आझाद मैदान मुंबई या ठिकाणी ५ लाख समाज बांधव जमणार आहेत. त्या मोर्चात राज्यातील मातंग समाजाने सहभागी व्हावे, असे आवाहन सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आले असून अकोले तालुक्यातील मातंग समाजाने देखील यात सहभागी व्हावे असे आवाहन दलीत मित्र प्रकाश साळवे यांनी केले आहे.

## नेप्ती विद्यालयाचे माजी विद्यार्थी वीस वर्षानंतर आले एकत्र; हृदयस्पर्शी स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा

● **नगर । वीरभूमी–**
नगर तालुक्यातील नेप्ती विद्यालयाच्या २००४ सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. तब्बल दोन दशकांनंतर विद्यालयाच्या आवारात पुन्हा एकदा त्या निरागस आठवणी जाग्या झाल्या. बालपणाच्या गोड वळणांवर नजर फिरवत, जुन्या शालेय जीवनातील आठवणीशी माजी विद्यार्थी पुन्हा एकरूप झाले होते, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.



स्नेहमेळाव्याचा शुभारंभ विद्यालय भेटीने झाला. त्यानंतर सर्व माजी विद्यार्थी नगर-पुणे रोडवरील केडगाव येथील एका हॉटेलमध्ये रंगतदार गेट टु गेदरसाठी एकत्र आले. कार्यक्रमाला विद्यालयातील तत्कालीन मुख्याध्यापक महेश जाधव तसेच इतर मान्यवर शिक्षक दत्तात्रय शिंदे, अरुण दळवी, श्रीकांत वाखारे, नानासाहेब घोडके, भास्कर कडूस, बाळासाहेब शेटे, कालिदास बडे, तुळसाबाई कदम, बाळासाहेब काळे, संजय ठोकळ, बाबासाहेब भोर, राजेंद्र झावरे, गोरख कोतकर, संतोष खरमाळे या सर्व शिक्षकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शाळेतील दिवसांची आठवण करून दिली. सर्व गुरुजनांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

या भावनिक कार्यक्रमात माजी विद्यार्थी कै. दिगंबर ठुबे आणि कै. माया इंगोले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमात हास्यविनोद, कविता गायन, गाणी, खेळ, जुन्या फोटोंची झलक, स्मरणिका सादरीकरण यांसारख्या गोष्टींमुळे वातावरण हलकंफुलकं आणि उत्साही राहिलं. काही विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनप्रवासातील अनुभव शेअर करत पुढच्या पिढीसाठी प्रेरणादायी विचार सांगितले. शेवटी सर्वांनी मिळून वृक्षसंवर्धन, शाळेसाठी निधी उभारणी, गावाचा विकास आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदतीचा संकल्प केला. केवळ स्नेहमेळावा न राहता हा एक सामाजिक बांधिलकीचा ठसा उमटवणारा कार्यक्रम ठरणार असल्याची भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# सेंद्रिय शेती मधून रोजगाराच्या मोठ्या संधी

## माजी आ. डॉ. सुधीर तांबे । थोरात कृषी महाविद्यालयात शाश्वत शेती व युवा उद्योजक कार्यशाळा संपन्न

● **संगमनेर । वीरभूमी–**
धावपळीच्या जीवनामध्ये प्रत्येक माणसाला सकस व चांगले आहाराची गरज आहे. मात्र लवकर आणि जास्त उत्पादनासाठी अनेक रासायनिक औषधांची कृषी उत्पादनावर फवारणी केली जाते. निरोगी समाजासाठी विषमुक्त शेती ही गरजेची आहे. शेती हा व्यवसाय म्हणून करताना सेंद्रिय शेती मधून रोजगाराची मोठी संधी असल्याचे प्रतिपादन जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा. आ.डॉ सुधीर तांबे यांनी केले आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालय व जयहिंद लोक चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने द्रोणागिरी हॉलमध्ये झालेल्या शाश्वत शेती व युवा उद्योजक कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राहुरी कृषी विद्यापीठाचे मृदा शास्त्रज्ञ डॉ अनिल दुर्गुडे, सेंद्रिय शेती संशोधन प्रकल्प प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डॉ. प्रशांत नाईकवाडी, डॉ. प्रशांत सावंत, अरविंद औताडे, डॉ बाळासाहेब राहणे, प्राचार्य डॉ. मनोहर पाचोरे, नारायणराव उगले, नरेश माळवे, डॉ.बाळासाहेब वाघ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ व प्रा. जी. बी. बाचकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी आ. डॉ. तांबे म्हणाले की, भारत हा कृषिप्रधान देश आहे भारतातील ५५% लोक हे शेतीवर अवलंबून आहेत तर त्यांचा उत्पादनात वाटा अवघा १५% आहे. त्यामुळे उत्पादनापेक्षा शेतीवरील भार वाढतो आहे. म्हणून शेतीमध्ये आधुनिकता अन्य गरजेचे आहे.

कमी श्रम, कमी वेळ, कमी पैसा व अधिक उत्पन्न हे तत्व वापरण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. विषमुक्त शेती ही अत्यंत गरजेची झाली असून निरोगी समाजासाठी निरोगी अन्न महत्त्वाचे आहे. जमिनीचा पोत व आवश्यक बाबी शेतीमध्ये टाकल्या पाहिजे. याच प्रमाणे शेतीसाठी कंपोस्ट खताचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे. जुन्या काळामध्ये खतासाठी खड्डे केले जायचे. मात्र सध्या खड्डे होत नसल्याने ते खत कंपोस्ट होत नाही.



शेतीलाही हवा, ऊन, वारा, पाणी मिळाले पाहिजे

शेती व्यवसायामध्ये महिलांचा वाटा मोठा असून तरुणांनी शेतीला व्यवसाय म्हणून पाहिले तर नक्कीच मोठे यश मिळू शकते .अनेक उच्चशिक्षित लोक आता शेतीकडे वळले आहे. आगामी काळात सेंद्रिय शेती ही अत्यंत महत्त्वाची असून या सेंद्रिय शेतीमधून उत्पादित सेंद्रिय मालाला मोठी मागणी आहे.

ऊस हे शाश्वत उत्पादन असून एकरी शंभर टक्के ऊस उत्पादन होण्यासाठी शेतकऱ्यांनी काम करावे असे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. राजेंद्र दुर्गुडे यांनी शेतीमधील पोत, शेतीचे प्रकार, माती परीक्षण, आवश्यक सेंद्रिय खतांचा पुरवठा, याबाबतचे मार्गदर्शन केले. यावेळी सेंद्रिय शेती बाबत डॉ उल्हास सुर्वे, डॉ. प्रशांत नाईकवाडी, प्रशांत सावंत, डॉ.बाळासाहेब राहणे, डॉ. मनोहर पाचोरे यांनीही मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा. विठ्ठल शेवाळे, संजय वाकचौरे, डॉ.विलास भांगरे, अनिल देशमुख, राधाकृष्ण गुळवे आदींसह विविध शेतकरी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले तर प्रा. जी. बी. बाचकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी संगमनेर व अकोले तालुक्यातील शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### थोरात कृषी महाविद्यालयाकडून शेतीवर विविध प्रयोग

■ महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी महाविद्यालयाच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन माती परीक्षण, हवामान, सेंद्रिय खतांचा वापर पद्धती याबाबत शेतकऱ्यांना अधिक माहिती देताना नवीन उत्पादनांबाबत शिक्षक व विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग करून यामध्ये शेतकऱ्यांना सहभागी करून घ्यावे असे आवाहन माजी आमदार डॉ. तांबे यांनी केले

# सुरत-चेन्नई आंतरराष्ट्रीय महामार्गालगतच्या जागेवर औद्योगिक क्लस्टर, लॉजिस्टिक पार्क उभारल्यास जिल्ह्यांच्या औद्योगिक विकासाला चालना मिळणार

## केंद्रीयमंत्री नितीन गडकरी । कोल्हार ते नांदूर शिंगोटे या १ हजार ३८० कोटी रुपये खर्चाच्या रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन

**राहाता । वीरभूमी–**

सुरत ते चेन्नई हा १ हजार ६०० किलोमीटर लांबीचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा महामार्ग असून त्यापैकी सुमारे ४८१ किलोमीटरचा भाग महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांतून जाणार आहे. या रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास होणार आहे. या रस्त्याच्या बाजूला महाराष्ट्र शासनाने जागा संपादन करून औद्योगिक क्लस्टर, लॉजिस्टिक पार्क उभे केल्यास पाचही जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला चालना मिळणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

३२६ कोटी रुपये किंमतीच्या नांदूर शिंगोटे ते कोल्हार १६० डी राष्ट्रीय महामार्गाच्या ४७ किलोमीटरच्या रस्त्याची सुधारणा, ७५० कोटी रुपयांच्या नगर – सबलखेड – आष्टी – चिंचपूर ५० किलोमीटरचा रस्ता, ३९० कोटी रुपयांच्या बेल्हे – अलकुरी – निघोज – शिरूर या ३८ किलोमीटर, आणि ११ कोटी रुपये किंमतीच्या श्रीगोंदा शहरातील पुलाच्या कामाचा अशा एकूण १ हजार ३८० कोटी रुपयांच्या कामाचे भूमिपूजन केंद्रीय मंत्री श्री.गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, खासदार राजाभाऊ वाजे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, आमदार काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, आमदार डॉ.किरण लहामटे, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार मोनिका राजळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य अभियंता संतोष शेलार, प्रशांत फेगडे, अधीक्षक अभियंता दयानंद विभूते आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. गडकरी म्हणाले, सुरत ते चेन्नई हा हरितमार्गावरील १ हजार ६०० किलोमीटरचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा व क्सेस कंट्रोल एक्सप्रेस हायवे आहे. या रस्त्यामुळे सुरत ते चेन्नई हे अंतर ३२० किलोमीटरने तर नाशिक ते सोलापूर हे अंतर १३५ किलोमीटरने कमी होणार आहे. भारतमाला प्रकल्प रद्द झाल्याने या रस्त्याच्या भूसंपादनासाठी नवीन प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. येत्या महिनाभरात या प्रकल्पाला मान्यता मिळेल, असा विश्वास व्यक्त करत मंत्रिमंडळाची मंजुरी मिळताच या रस्त्यांसाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत, त्यांना याचा मोबदला तातडीने वितरण करून रस्त्याच्या कामालाही सुरुवात करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

धुळे – अहिल्यानगर या बीओटी तत्त्वावरील रस्ता असल्याने या रस्त्याच्या कामासाठी अडचण येत होती. परंतु बीओटी रस्त्याची मुदत संपल्याने राष्ट्रीय महामार्गाने रस्त्याचा कामाचा डीपीआर तयार करण्यात येत असून उपलब्ध जागेनूसार हा रस्ता सहा पदरी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच नगर – करमाळा – टेभुर्णी – सोलापूर या ८० किलोमीटर या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी १ हजार १०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून कामाची निविदाही निश्चित करण्यात आली आहे. सीआरएफ मध्ये २७१ कोटींची २५ कामे असून २५ कोटी रुपयांची ३ कामे यावर्षी सुरू होत असल्याचेही ते म्हणाले.

अहिल्यानगर – शिर्डी या रस्त्याचे काम घेतलेल्या व ते पूर्ण न केलेल्या ३ कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात यावे. त्यांची बँक गॅरंटी जप्त करण्याची सूचना करत या कामासाठी नव्याने निविदा काढण्यात आली असून हे काम लवकरच पूर्ण होईल, असा विश्वासही श्री.गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

गतकाळात जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी केवळ २०२ किलोमीटर एवढी होती. परंतु विद्यमान शासनाच्या काळात रस्ते विकासाची ८७० किलोमीटरची कामे केल्याने ती आता १ हजार ७१ किलोमीटर झाली आहे. जिल्ह्यात ६ हजार २०८ कोटी रुपयांची रस्ते विकासाची कामे पूर्ण करण्यात आली असून ३ हजार ५०० कोटी रुपयांची कामे प्रगतीत आहेत. १ हजार ५०० कोटी रुपयांची कामे नव्याने मंजूर करण्यात आली आहे, असेही श्री. गडकरी यांनी सांगितले.



पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, रस्ते विकासाची अशक्य वाटणारी कामे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कल्पकतेतून पूर्ण झाली आहेत. रस्ते विकासामुळे त्या भागातील विकासाला चालना मिळण्याबरोबरच शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला मालाची कमी वेळेत वाहतूक केल्याने शेतकऱ्यांनाही मोठा फायदा होईल. नाशिक येथे आगामी काळात आयोजित सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी अनेक भाविक अहिल्यानगरसह शिर्डीमध्ये येणार आहेत. त्यामुळे अहिल्यानगर – शिर्डी या रस्त्याच्या कामाबाबत ठोस निर्णय घेऊन हे काम वेळेत पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करत कसारा फाटा ते कोल्हार पर्यंतच्या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात यावे, असेही ते म्हणाले.


कार्यक्रमास पदाधिकारी, अधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरातील धोकादायक अवस्थेत असलेल्या १५ इमारती पडण्याचे महानगरपालिकेचे आदेश

## पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, गटारी, ड्रेनेज दुरुस्ती करण्याच्या सूचना

**नगर । वीरभूमी–**

महानगरपालिका प्रशासनाने ्हरातील १५ अतीधोकादायक ्वस्थेतील इमारती पडण्यासाठी ्क्रिया सुरू केली आहे. यात ्हुतांश इमारती या मध्य शहरातील ्ाहेत व त्यातील काहींचा वापरही ्रू आहे. पावसाळ्यापूर्वी या ्मारती उतरवून घेण्याचे आदेश ्ायुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे ्ांनी बांधकाम विभागाला दिले ्ाहेत. नागरिकांनी धोकादायक ्वस्थेतील इमारती स्वतः ्न काढून घ्याव्यात, अन्यथा ्हानगरपालिका कारवाई करून ्ाढतील, असा इशारा त्यांनी ्देला. दरम्यान, पावसाळ्यापूर्वी ्ालेसफाई पूर्ण करा, ड्रेनेज लाईन ्रुस्तीची कामे पूर्ण करा, अशा ्ूचनाही त्यांनी दिल्या आहेत.



आयुक्त तथा प्रशासक ्शवंत डांगे यांनी गुरुवारी ्हानगरपालिकेत मान्सून पूर्व ्ामांचा आढावा घेतला. ्ठकीस उपायुक्त विजयकुमार ्डे, संतोष टेंगळे, शहर अभियंता मनोज पारखे यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते. शहरातील धोकादायक इमारतींवर सुरू असलेल्या कारवाईचा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी आढावा घेतला. धोकादायक अवस्थेत असलेल्या शहरातील १९७ इमारतींना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच, १६ धोकादायक इमारतींबाबत न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. तर, १५ इमारती अती धोकादायक अवस्थेत असल्याचे बांधकाम विभागाने स्पष्ट केले. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी या धोकादायक इमारतींवर कारवाई करण्याचे आदेश दिले. तसेच, इमारत मालकांनाही स्वतःहून इमारती काढून घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच, १९७ इमारतींना नोटिसा बजावून त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे व अहवाल सादर करण्याचे आदेश यापूर्वीच देण्यात आलेले आहेत. या इमारत मालकांनाही दुरुस्ती अथवा धोकादायक भाग उतरवून घेण्यासाठी सूचना द्याव्यात, असे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

मान्सून पूर्व कामांचा आढावा घेताना शहरातील झाडांच्या धोकादायक अवस्थेत असलेल्या फांद्या काढण्याचे, धोकादायक झाडे काढण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. पावसाळ्यात नाल्या, गटारी तुंबणार नाही, या दृष्टीने त्यांची साफसफाई करून घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. ड्रेनेज लाईन, चेंबर दुरुस्ती करून घ्यावी, ड्रेनेज लाईनची साफसफाई करण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले. नागरिकांना पावसाळ्यात अडचण होऊ नये, यासाठी प्रलंबित रस्त्यांची कामे पूर्ण करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

# संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या आठ अभियंत्यांची व्हिजन व्हेव्ज कंपनीत नोकरीसाठी निवड



**कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग आपल्या विद्यार्थ्यांना चांगल्या पॅकेजच्या नोकऱ्या मिळाव्यात व पालकांच्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात या हेतुने विविध कंपन्यांशी संपर्क साधुन कंपन्यांच्या गरजेप्रमाणे आपल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करतो. अशाच प्रयत्नातुन आर्टिफिशियल इंटिलिजंस (एआय) व मशीन लर्निंग (एमएल) क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्हिजन व्हेव्ज कंपनीचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. या ड्राईव्ह मध्ये या कंपनीने कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या अंतिम वर्षातील आठ अभियंत्यांची वार्षिक पॅकेज रू सहा लाखांवर नोकरीसाठी निवड केली आहे, अशी माहिती महाविद्यालयाच्या अधिकृत सुत्रांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये व्हिजन व्हेव्ज कंपनीने अभिषेक प्रभाकर आभाळे, तौफिक अन्सार अत्तार, वैभव विक्रम भोरकडे, अभिषेक राजेंद्र गायकवाड, आदिती लक्ष्मण बैरागी, प्रशांत अशोक पाचोरे, क्षितिजा विनायक ठाकुर व ऋषिकेश मधुकर राऊत यांची नोकरीसाठी निवड केली आहे.

या यशाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष श्री. नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी श्री. अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

> मी कोपरगाव येथील सर्वसामान्य कुटूंबातील मुलगी आहे. मी अगोदर संजीवनी पॉलीटेक्निकमधुन कॉम्प्युटर टेक्नॉलॉजीचा डीप्लोमा केला. डीप्लोमाला असताना संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या अनेक मुलांना व मुलींना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळायच्या हे पाहत असे. त्यामुळे मी येथेच डीग्री पुर्ण करण्याचा निश्चय केला आणि मला डीप्लोमाला चांगले मार्कस् असल्यामुळे कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळाला. अगदी दुसऱ्या वर्षापासून आमच्यासाठी मुलाखतीचे तंत्र, तज्ञांची मार्गदर्शने, नामांकित कंपन्यांचे अभ्यास दौरे, आदी उपक्रम राबविण्यात आले. कंपनीच्या कॅम्पस ड्राईव्हच्या अगोदर आमच्याकडून मुलाखतीचा भरपुर सराव करून घेण्यात आला. सरावाच्या वेळेस जे प्रश्न विचारण्यात आले होते, तेच बहुतांशी प्रश्न प्रत्यक्ष मुलाखतीत विचारण्यात आले. यात कंपनीने एआयएमएल, कोडींग, वेब डेव्हलपमेंट, इत्यांदीवर अधिक भर दिला. तसेच समुह कार्यपध्दतीवर कल जाणुन घेण्यासाठी समुहामध्ये कोणते प्रोजेक्ट केले व त्याची फल निष्पत्ती काय मिळाली, हे विचारले. या सर्व प्रश्नांचा माझा सराव झाला होता, त्यामुळे मुलाखत मी सहजपणे देवू शकले आणि माझी नोकरीसाठी निवड झाली. संजीवनीमुळे माझे व माझ्या पालकांचे नोकरीचे स्वप्न पुर्ण झाले.
>
> – **आदिती बैरागी,** नवोदित अभियंता

# निमगाव वाघा येथे मोफत नेत्र तपासणी शिबिरास प्रतिसाद

**नगर । वीरभूमी–**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ग्रामीण भागातील दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींना नवदृष्टी देण्याच्या उद्देशाने स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि वैष्णवी ऑप्टीकल्स यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्य व डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते झाले.




यावेळी लक्ष्मण चौरे, रामदास पवार, नवनाथ हारदे, डॉ. वैष्णवी जरबंडी, डॉ. आकाश जरबंडी, डॉ. ओमकेश कोंडा, नवनाथ कृपा महिला ग्रामसंघ (सीआरपी) सोनाली फलके, मंगल ठाणगे, अनिल आनंदकर, रामचंद्र फलके, युवा मंडळाचे अध्यक्ष संदीप डोंगरे, नवनाथ हारदे, जयवंत जाधव आदी उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, सध्या आरोग्य सेवा महाग झालेली असताना सामान्य जनतेला तिचा लाभ घेणे कठीण झाले आहे. ग्रामीण भागातील ज्येष्ठ ग्रामस्थांना डोळ्यांच्या समस्या अधिक भेडसावतात. अशा शिबिरातून गरजूंना आधार मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. वैष्णवी जरबंडी यांनी सेवाभावाने ग्रामीण भागात आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामधील दृष्टीदोष असलेल्या अनेक नागरिकांवर अल्पदरात विविध शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याची त्यांनी माहिती दिली.

गावातील श्री संत सावता महाराज मंदिराच्या सभामंडपात शिबिर पार पडले. या शिबिरात अद्ययावत संगणकीय उपकरणांद्वारे १२५ ग्रामस्थांची नेत्र तपासणी करण्यात आली. गरजू नागरिकांना अल्प दरात नंबरचे चष्मे वाटप करण्यात आले. तसेच मोतीबिंदू व काचबिंदूसारख्या डोळ्यांच्या आजारांसाठी अल्पदरात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

# जिल्ह्यात गारपीट, अवकाळीने २८ गावांतील पिकांचे नुकसान

**नगर । वीरभूमी–**

गेल्या सोमवारी (दि. ५) व मंगळवारी (दि. ६) जिल्ह्यात झालेला अवकाळी पाऊस, वादळी वारे व गारपिटीचा जिल्ह्यातील ८ तालुक्यांतील २८ गावांना फटका बसला. तेथील १३०.४३ हेक्टर क्षेत्रातील विविध पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे २६६ शेतकरी बाधित झाले आहेत. कांदा, भाजीपाला, आंबा, चारापिके, डाळिंब, केळी आदी पिकांचे नुकसान झाले.

जिल्हा कृषी विभागाने हा प्राथमिक अंदाज वर्तवला आहे. सर्वाधिक फटका पारनेर तालुक्याला बसला. शिवाय श्रीगोंदे, जामखेड, राहुरी, पाथर्डी, अकोले, कोपरगाव, राहता या तालुक्यातही कमीअधिक स्वरुपाचे नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसाचा व वादळी वाऱ्यांचा पूर्वानुमान हवामान विभागाने वर्तवला होता.

सोमवारी झालेला अवकाळी पाऊस व गारपिटीने २२ गावे बाधित झाली, त्यात २३१ शेतकऱ्यांचे १२०.३ हेक्टर क्षेत्रातील विविध पिकांचे नुकसान झाले. ही गावे पारनेरसह पाथर्डी, राहुरी, जामखेड व श्रीगोंदे तालुक्यातील आहेत. येथील ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेले क्षेत्र १११.४९ हेक्टर आहे व बाधित शेतकऱ्यांची संख्या २१३ आहे. ३३ टक्केपेक्षा कमी नुकसान झालेले क्षेत्र ८.५४ हेक्टर व बाधित शेतकऱ्यांची संख्या १८ आहे.

मंगळवारी झालेली गारपीट व अवकाळी पावसाचा फटका ६ गावांतील ३५ शेतकऱ्यांना बसला. त्यामुळे १०.४० हेक्टर क्षेत्र बाधित झाले. हा पाऊस पाथर्डी, अकोले, कोपरगाव व राहता या तालुक्यात झाला. ३३ टक्केपेक्षा अधिक नुकसान झालेले क्षेत्र ७.८० हेक्टर आहे. बाधित शेतकरी १२ तर ३३ टक्क्यांपेक्षा कमी नुकसान झालेले क्षेत्र २.६ हेक्टर व बाधित शेतकरी संख्या २३ आहे.

हवामान विभागाने काल, बुधवार व आज, गुरुवारी जिल्ह्यात पुन्हा पावसाचा अंदाज वर्तवला होता. काल नगर शहरासह पाथर्डी, शेवगाव परिसरात पाऊस झाला. आजही दिवसभर हवामानात बदल झालेला होता. हवेतील उकाडा कमी होऊन काहीसा गारवा पसरला होता. रात्रीच्या तापमानातही घट झालेली आहे.